<u>रे.मु.नं. २८३/२०१८ मधील नि.१५ वरील आदेश</u>

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांच्येविरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्याच्या विनंतीने केला आहे.

२ प्रतिवादी क्र. २ व ३ असे कथन करतात की, त्यांची बस खराब झाल्याने ते न्यायालयात उशीरा आले व न्यायालयात वेळेत हजर राहू न शकल्याने त्यांचेविरूध्द कैफियत नाही हा आदेश पारीत करण्यात आला. न्यायाच्या दृष्टीने सदर आदेश रद्द होणे गरजेचे आहे. सबब प्रस्तूत अर्ज.

३ वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून त्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्यांच्या मते, सदरचा अर्ज खरा व बरोबर नसून तसे वादीस कबूल नाही व सदरचा अर्ज कायदेशीर नसल्याने नामंजूर होण्यास पात्र आहे.

४ सदर कामी दावा हा निरंतर ताकीदीच्या विनंतीने केलेला आहे. प्रतिवादीनी या अर्जासोबत त्यांची कैफियत दाखल केली आहे. त्यामूळे न्यायाच्या दृष्टीने क्र. २ व ३ यांना संधी देणे करीता सदरचा अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्च रक्कम रू. १००/— प्रतिवादीने वादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च दिल्यावर प्रतिवादी क्र. २ व ३ विरूध्द झालेला कैफियत नाही आदेश रद्द ठरेल.

३. वादी अथवा त्यांच्या वकीलास पुढील तारखेपर्यत प्रस्तूत अर्जाचा खर्च देणे बंधनकारक राहील.

दि.१८.०७.२०१८ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क स्तर,बार्शी

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd JtCJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 18/7/2018 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 18/7/2018 |
| Judgment/Order uploaded on | : : | 19/7/2018 |